# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट, २०१३

## (सकाळी ०९.१५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक २५ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)**

(१) **प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"माहे डिसेंबर, २०१२ पासून विदर्भातील एकूण ८ जिल्ह्यांसाठी रुपये ३२०० कोटी तरतुदीच्या विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत अत्यंत अल्प निधी खर्ची घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, या कार्यक्रमामध्ये अमरावती विभागातील ५ व नागपूर विभागातील ३ जिल्ह्यांचा समावेश असणे, या कार्यक्रमांतर्गत सदर ८ जिल्ह्यांसाठी ५ वर्षांकरीता रु.३२०० कोटींची तरतूद असणे, परंतु माहे डिसेंबर, २०१२ पासून ६ महिन्यांमध्ये अमरावती विभागात फक्त रु.१३ कोटी तर अमरावती जिल्ह्यात केवळ रु.२.५० कोटी निधी खर्च करण्यात येणे, कार्यकारी यंत्रणेकडील अनेक रिक्त पदांची संख्या व यंत्रणेकडे पुरेशी वाहने उपलब्ध नसल्याने अंमलबजावणीत अडचण निर्माण होणे, तसेच कामांना प्रचंड वाव असताना प्रकल्पांच्या मापदंडांमध्ये सुधारणा, ७० हजार प्रति हेक्टर दुरुस्ती कामांच्या मापदंडांमध्ये सुधारणा, पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, सदर महत्वाकांक्षी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने विदर्भावर होत असलेला अन्याय, यामुळे विदर्भातील शेतकरी बांधवांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे विभागांतर्गत रिक्त पदे तातडीने भरणे, पुरेशी वाहने उपलब्ध करून देणे व योजनेच्या मापदंडात आवश्यक सुधारणा तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(दिनांक २९ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. २)**

(२) **सर्वश्री गोपालदास अग्रवाल,** सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री.नानाजी शामकुळे, विजय घोडमारे, नाना पटोले, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"गोंदिया तालुक्यात दिनांक १३ व १४ जुलै, २०१३ च्या मध्यरात्री सहा तासात २२४ मि.मि. पाऊस झाल्यामुळे अनेक घरात पाणी शिरुन घरांची पडझड होणे, त्यात १ जण वाहून

जाणे, काही घरे व झोपड्या कोसळणे, लो लाईन एरियात पाणी भरुन अतोनात झालेले नुकसान, गोंदिया शहराच्या सीमेवर कुडवा ग्राम येथे असलेला बांध तलाव फुटल्यामुळे गोंदिया शहरामध्ये प्रभाग क्रमांक ३ व १ मध्ये तसेच कुडवा ग्राममध्ये मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, शहरातील अनेक रस्ते वाहून जाणे, त्याचप्रमाणे संजय नगर, गौरी नगर वसाहतीत सुरक्षा भिंत नसल्याकारणास्तव अनेक घरात पाणी शिरुन धोकादायक परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे या परिसरात पसरलेली असंतोषाची परिस्थिती, या सर्व बाबींवर स्थायी पूरनियंत्रण व्यवस्था करण्याची आवश्यकता, सुरक्षा भिंत बांधण्याची गरज, बांध तलाव बांधण्याची आवश्यकता, सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाले बांधकामाची गरज तसेच या भागातील अनेक वाहून गेलेल्या रस्त्याच्या बांधकामासाठी करावयाची कार्यवाही व गोंदिया शहरातील नुकसानग्रस्तांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(दिनांक ०१ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. ३)**

(३) **सर्वश्री सुधाकर देशमुख,** देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, कृषिभूषण साहेबराव पाटील, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, नितीन भोसले, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, डॉ.सुधाकर भालेराव, सर्वश्री.नाना पटोले, एकनाथराव खडसे (पाटील), अबू आजमी, शरद गावित, रशीद मोमीन, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री.महादेव बाबर, कुमार आयलानी, नवाब मलिक, रमेश थोरात, अब्दुल सत्तार, राजहंस सिंह, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, अस्लम शेख, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात २३,५६६ संस्था वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे, तसेच ३७,३३० हेक्टर जमीन उपलब्ध असणे, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांना ३५,०००/- रुपयांची लाच घेताना झालेली अटक, तीन राज्यांतील कोट्यवधींची संपत्ती जप्त करण्यात येणे तसेच त्यांच्या निवासस्थानी वक्फच्या जमिनीसंबंधातील संशयास्पद कागदपत्रे सापडणे, बोर्डाच्या मालमत्तांचा भाडे करार वाढविणे, रद्द करणे वा नवे करार करणे आदी निर्णयांचे अधिकार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांना नसतानासुद्धा निर्णय घेणे, तीन वर्षांपूर्वी मुख्य दक्षता आयुक्तांनी पंतप्रधान कार्यालयास वक्फ बोर्डातील गैरव्यवहारासंदर्भात घोटाळ्यांच्या चौकशीची मागणी करणे, वक्फच्या गत २५ वर्षांतील कारभाराची सीबीआय चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येणे, राज्यातील मुस्लिम समाजाने वक्फकरिता दिलेल्या जमिनींना या अधिकाऱ्यांकडून संगनमताने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, तसेच राज्यात वक्फ बोर्डाची हजारो एकर जागा असणे व यासंदर्भात वक्फ बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत गैरव्यवहार सुरु असणे, परिणामी संपूर्ण राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संतापाची भावना, याबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांच्याविरुद्ध सीबीआय चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(दिनांक ०१ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या लक्षवेधी सूचना क्र. ४ ते ७)**

(४) **सर्वश्री एकनाथ शिंदे,** राजन विचारे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी जारी केलेल्या सीआरझेडच्या नव्या अध्यादेशामुळे मुंबई जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या पुनर्विकासासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीच्या आधारे अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्याचा मार्ग मोकळा होणे, त्यामुळे या भागातील इमारती आणि चाळींचा पुनर्विकास दृष्टिपथात आला असणे, परंतु मुंबईला खेटून उभ्या असलेल्या ठाणे जिल्ह्यातील सीआरझेडने बाधित असलेले कोळीवाडे आणि इमारतींना त्या अध्यादेशाचा लाभ मिळत नसणे, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील समस्यांमध्ये फारसा फरक राहिलेला नसून मुंबई आणि ठाण्यातील नियमावलीत भेदभाव करणे योग्य नसणे, व्यापक हितासाठी सीआरझेड कायद्याची नवी नियमावली मुंबईपाठोपाठ ठाणे शहरासाठीसुध्दा लागू व्हायला हवी, परंतु तसे होत नसल्याने ठाण्याच्या कोपरी परिसरातील सुमारे १६५ इमारती आणि अनेक चाळींचा पुनर्विकास अशक्य होणे, ठाणे, नवी मुंबई, वसई, विरार अशा सागरी आणि खाडी किनारी असलेल्या शहरातील लाखो रहिवाशांना त्याचा मोठा फटका बसत असणे, रितसर परवानगी मिळत नसल्याने काही मंडळींकडून बेकायदा बांधकामे होण्याची शक्यताही नाकारता येत नसणे, त्याचप्रमाणे १९७४ पूर्वीच्या इमारतींच्या पुनर्बांधणीसाठीच प्रोत्साहनपर चटईक्षेत्र देण्याचे शासनाचे धोरण असणे, या धोरणात सुधारणा करून ३० वर्षापूर्वीच्या इमारतींना त्या सवलती दिल्यास अनेक इमारतींच्या पुनर्बांधणीचा मार्ग प्रशस्त होईल, याबाबत शासनाने केलेली किंवा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री संदीप नाईक,** जितेंद्र आव्हाड **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नवी मुंबई परिसरात सिडको महामंडळाने गृहनिर्माण योजनेअंतर्गत मध्यम व कमी उत्पन्न गटातील व्यक्तींसाठी बांधलेल्या इमारती, इमारतींचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने अल्पावधीतच अनेक इमारतींमधील सदनिकांचे स्लॅब कोसळण्याच्या घडलेल्या घटना, त्यात महिला व लहान मुले गंभीररित्या जखमी होणे, इमारतींना तडे गेल्याने पावसाळ्यात पाणी झिरपत असणे, त्यामुळे इमारतींमधून राहणारे हजारो रहिवासी जीव मुठीत धरुन जीवन जगत असणे, या इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम तात्काळ हाती न घेतल्यास केव्हाही इमारती कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता, सिडकोने इमारतींचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असल्यामुळेच अल्पावधीतच इमारती जीर्ण झाल्या असून मोडकळीस आल्या असल्याचे नागरिकांचे ठाम मत झालेले असणे, त्यामुळे जनतेचा सिडकोवरील उडालेला विश्वास, त्यांच्यामध्ये पसरलेली संतापाची भावना, या इमारतींना २.५ एफएसआय मंजूर करुन त्यांच्या पुनर्बांधणीचे काम हाती घ्यावे म्हणून ठाणे जिल्हा पालकमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने करीत असलेले प्रयत्न."

**(६)** **ॲड.आशिष जयस्वाल,** सर्वश्री संजय राठोड, नरेंद्र भोंडेकर, दादाजी भुसे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नागपूर जिल्ह्यातील कन्हान ही राज्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून सदर ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असताना शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी गावाच्या नागरी सुविधा पुरविणे अडचणीचे होणे, ग्रामपंचायतीचे उत्पन्न कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होत असल्याने ग्रामपंचायतीमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असणे, ३५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात ग्रामपंचायत असमर्थ ठरणे, सर्व कागदपत्रांची पूर्तता करून जिल्हाधिकारी, नागपूर यांनी परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर शासनाच्या लालफितीच्या कारभारामुळे कन्हान ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतरण न होणे, सर्व राजकीय पक्षांची मागणी असताना नगरपरिषदेचे सर्व निकष पूर्ण होत असताना शासनाच्या उदासिनतेमुळे व दिरंगाईमुळे याबाबत निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष, लोकप्रतिनिधींचा सतत पाठपुरावा व मागणी असतानाही शासनाकडून हा निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे, उपरोक्त प्रकरणी शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७)** **सर्वश्री विनय कोरे,** चंद्रकांत हंडोरे, नवाब मलिक, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"बृहन्मुंबईच्या 'एम' विभागातील गावदेवी कंपाऊंड चेंबूर येथील सी.टी.एस. क्र.१७२० या सुमारे ३७१७.९० चौ.मी. एकूण क्षेत्रफळाच्या जमिनीवर सन १९५२ पासून वस्ती करून राहणाऱ्या व नंतर सातत्याने वाढत गेलेल्या व आता अस्तित्वात असलेल्या २१४ झोपडीधारकांनी श्री.गणेश गावदेवी सहकारी संस्था स्थापन केलेली असणे व महाराष्ट्र शासनाच्या पुनर्वसन योजनेच्या (एस.आर.ए.) नियमानुसार पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, सिटी सर्व्हे क्र.१७३१ व १७३१/१ ते ३ या गोल्फ क्लबच्या आरक्षणाचे क्षेत्र १,८७,७३९.६० चौ.मी. इतके असणे, पूर्वी सिटी सर्व्हे क्र.१७२१, १७२२ आणि १७३१ या लगतच्या जमिनीवर देखील गोल्फ क्लबचे आरक्षण असणे, सिटी सर्व्हे क्र.१७२१ आणि १७२२ या जमिनीवरील आरक्षण सन १९९२ च्या सुधारित विकास योजनेमध्ये आरक्षणातून वगळण्यात आलेले असणे, सिटी सर्व्हे क्र.१७२० चे गोल्फ क्लबचे आरक्षण क्षेत्र १२४३.९० चौ.मी.असून त्यावर झोपड्या अस्तित्वात असूनदेखील गोल्फ क्लबकरिता नामनिर्देशित (डेसिग्नेटेड) अस्तित्वात असलेले दर्शविण्यात आलेले असणे, त्यामुळे सदरची पुनर्विकास योजना मंजूर होऊनदेखील पूर्णत्वास नेण्यात अडथळे निर्माण होत असणे, गोल्फ क्लबच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे त्यांचे नावे स्वतंत्र मालमत्तापत्र असून त्यात सिटी सर्व्हे क्र.१७२० मधील १२४०.९० चौ.मी. डेसिग्नेटेड रिझर्वेशन क्षेत्र अंतर्भूत नसणे, गोल्फ क्लबद्वारे आवार भिंतीचे बांधकाम सदर १२४०.९० चौ.मी. डेसिग्नेटेड रिझर्वेशन जागेच्या बाहेरुन केलेले असणे, गोल्फ क्लबकरिता या भूभागाचे हे क्षेत्र आवश्यक नसून सदर पुनर्विकास योजना पूर्णत्वास नेण्याकरिता सदर जागेचे आरक्षण बदलण्यास गोल्फ क्लबची हरकत नसणे व तसे लेखी पत्र

त्यांच्यातर्फे देण्यात आलेले असणे, सदर जागेवरील गोल्फ क्लबकरिता असलेले डेसिग्नेटेड रिझर्वेशन वगळण्याकरिता विकासकाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ उप कलम १(ब) च्या मान्यतेनुसार बृहन्मुंबई क्षेत्रात पुनर्वसन योजना राबविण्याकरिता आरक्षण वगळून निवासी वापर फेरबदल करणेबाबत कलम ३७(२) च्या मान्यतेकरिता अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये सादर करणे व तो अंतिम मान्यतेकरिता नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, सदर प्रस्तावावर नगरविकास विभागातर्फे कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी पात्र लाभार्थ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

**(८)** **श्री.मंगल प्रभात लोढा, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई गिरगाव चौपाटी येथील बिर्ला क्रीडा केंद्र सन २००५ पासून बंद असणे, बिर्ला क्रीडा केंद्र हे महापालिकेच्या मालकीचे असणे, या केंद्रामध्ये सभागृह असणे, गिरगाव भागातील सभागृह व क्रीडा केंद्र याचा उपयोग स्थानिक जनता करीत असणे, या भागामध्ये पर्यायी अशा प्रकारची व्यवस्था नसणे, मुंबई महानगरपालिकेचे या बिर्ला क्रीडा केंद्राचे नूतनीकरण किंवा दुरुस्ती या दोन्ही बाबींकडे झालेले दुर्लक्ष, अनेक वेळा त्यासाठी लेखी पत्रव्यवहार व बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे त्या भागातील अत्यंत उपयोगी असे क्रीडा केंद्र नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, शासनाने या बाबींची गंभीर दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९)** **श्रीमती माधुरी मिसाळ,** सर्वश्री गिरीश बापट, भिमराव तापकीर, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री बापूसाहेब पठारे, विलास लांडे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप**, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे महानगरपालिका क्षेत्रात म्हाडाच्या तसेच सन १९६१ मध्ये पानशेत धरण फुटल्याने महापुरातील अनेक पूरग्रस्त इमारती धोकादायक अवस्थेत असणे, सदर इमारतीपैकी अनेक इमारतींच्या भिंतींना तडे, मोठमोठया चिरा पडलेल्या असणे, अनेक इमारतीच्या खिडक्यांवरील सज्जे पडून लहान मुलांना अपघात झालेला असून यापुढेही असेच गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता, तसेच येरवडा येथील म्हाडा वसाहतीतील एल-४४, बिल्डींग एका बाजूला खचली असल्याने जवळपास १०० ट्रक रॅबिट टाकलेली असणे, तसचे काही इमारतीच्या तळमजल्यातून पाणी येत असणे, त्यामुळे सदरहू इमारती केव्हाही पडण्याची/कोसळण्याची दाट शक्यता, अशा धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतींमध्ये हजारो कुटुंबाचे वास्तव्य असणे, मुंबईप्रमाणे पुणे शहरातील म्हाडा वसाहतीसाठी सन २०११ मध्ये २.५ एफ.एस.आय. मंजूर करण्यात आलेला असतानाही अद्यापपर्यंत सदर एफएसआयचे वाटप व नियमावली तयार करण्यात आलेली नसणे, येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण राज्यमंत्री यांचेकडे अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही म्हाडा प्रशासनाकडून हेतु:पुरस्सर अडथळा निर्माण केला जात असणे, त्याचप्रमाणे पुण्यात असलेल्या म्हाडा वसाहतीतील सोसायटयांचा कन्व्हेयन्स देण्यात म्हाडा कार्यालयाकडून विलंब होत असल्याने पुनर्विकासाअभावी येथील अनेक इमारती मोडकळीस आलेल्या असणे, म्हाडा

वसाहतींचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेला असणे, याबाबत गत अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. मुख्यमंत्री यांनी येत्या तीन महिन्यात नियमावली तयार करण्याचे दिलेले आश्वासन, परंतु याबाबत अद्याप कुठलीही कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांचेकडे अलिकडील काळात वारंवार निवेदन देऊनही कुठलीही कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकात पसरलेला असंतोष व निराशेची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०)** **सर्वश्री विलास लांडे,** जीतेंद्र आव्हाड, बापूसाहेब पठारे, अण्णा बनसोडे, लक्ष्मण जगताप, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पिंपरी-चिंचवड शहराच्या निर्मितीपासून ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका परिसराचे होत असलेले प्रचंड नागरीकरण, देशभरातील विविध ठिकाणांहून नागरिक बहुसंख्येने शहर परिसरांमध्ये येत असल्याने शहरातील मूलभूत सोयी सुविधांवर प्रचंड ताण येत असणे, स्थानिक नागरिकांनी नगर पंचायत, नगरपालिका असताना जागा घेवून कर्ज काढून गुंठे-दोन गुंठे जागा घेवून घरे बांधलेली असणे, सन १९९७ मध्ये पालिका हद्दीलगतची गावे महापालिकेत समाविष्ट होणे, सदर वाड्या-वस्त्यावरील बांधकामे अतिशय जुनी असतानाही महापालिका हद्दीतील सदरची बांधकामे विनापरवाना बांधकामे ठरवून सहा महिन्यात पाडून टाकण्याची कार्यवाही करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असणे, महापालिका प्रशासनाकडील सर्वेक्षणानुसार परिसरातील एक लाख दहा हजार बांधकामे विनापरवाना असल्याचे निदर्शनास येणे, त्यानुसार पालिकेकडून कलम ५३ अन्वये नोटीसा पाठविण्यात आल्याने लक्षावधी नागरिक बेघर होणार असल्याने सदरची बांधकामे ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथील विनापरवाना बांधकामांना नियमित करण्याच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महासभेने शासनाकडे ठराव सादर केलेला असणे, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१२ मध्ये वारंवार मागणी केलेली असणे, यासंदर्भात बेघरांना दिलासा देण्याकरिता डिसेंबर, २०११ मधील विधीमंडळ अधिवेशनामध्ये सदर बांधकामे दोन महिन्यात नियमित करण्याचे आश्वासन देणे, परंतु अद्यापपर्यंत नियमित करण्यात न येणे, सद्यःस्थितीत माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१२ पासून सदरची बांधकामे पाडण्याची जोरदार मोहिम सुरु असल्याने लक्षावधी नागरिक बेघर होणार असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांनी आठ दिवसात अध्यादेश काढण्याची घोषणा करुनही अद्यापही अध्यादेश काढण्यात न येणे, परिणामी तेथील लक्षावधी नागरिकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व भितीचे वातावरण, त्यामुळे परिसरातील गोरगरीब कुटुंब व स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा दिलेला इशारा, तसेच सर्वसामान्य समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या निवाऱ्याची सोय करणे गरजेचे असल्याने सदरची विनापरवाना बांधकामे नियमित करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(११)** **श्री.चिमणराव पाटील, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"जळगाव जिल्ह्यातील आंतरनदी जोड प्रकल्प सुमारे ४ वर्षापूर्वी मंजूर झाला असून अद्यापही तो अपूर्णावस्थेत असणे, सदर प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे २७ कोटी रुपये खर्च झालेला असून सदर नदीजोड प्रकल्प हा जळगाव जिल्ह्यातील पारोळा, भडगाव, पाचोरा, अमळनेर, एरंडोल व जामनेर या अवर्षणप्रवण तालुक्यांना लाभ देणारा असणे, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या नदीजोड प्रकल्पास प्रथम प्राधान्य दिलेले असणे, नदी जोड प्रकल्पांना केंद्र शासनाने राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केलेले असणे, सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी पारोळा येथील लोकप्रतिनिधींनी मा.उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांचेशी माहे जून, २०१३ मध्ये व त्यापूर्वी अनेकवेळा चर्चा करणे, सदरहू प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याचे सकारात्मक आश्वासन देणे, जळगाव जिल्हा नियोजन समितीने सदर प्रकल्पाच्या कामासाठी ८४५ लक्ष रुपये निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक ८ जुलै, २०१३ रोजीच्या पत्रान्वये अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केला असणे, नदीजोड प्रकल्प अवर्षणप्रवण तालुक्यात असल्यामुळे त्यास त्वरित मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

**(१२)** **श्रीमती मीनाक्षी पाटील,** सर्वश्री.विवेक पाटील, धैर्यशिल पाटील, **वि.स.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"रायगड जिल्ह्यातील विशेषत: अलिबाग तालुक्यातील खाडी किनारी असलेल्या भातपिकाखालील जमिनींची वंशपरंपरागत शेतकऱ्यांच्या नावे ७/१२ दप्तरी सरकारी नोंद असणे, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या खारभूमी योजना अपुऱ्या निधीमुळे पूर्ण होत नसल्याने भातपिकाखालील जमिनीत खारे पाणी शिरुन जमिनीच्या बाधित क्षेत्रात वाढ होणे, समुद्राच्या मोठ्या उधाणामुळे पाण्यात मँग्रोजचे बीज वाहत येऊन शेतीमध्ये रुजणे, सदर भातपिकाखालील जमिनी पूर्वापार शेतजमिनी असल्याबाबत शासन दरबारी नोंद असतानाही एन.जी.ओ.मार्फत अप्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार भातपिकाखालील जमिनी मँग्रोजयुक्त असल्याचा अहवाल सादर करून शासनाची फसवणूक करणे, जमीन लागवडीखाली आणताना अकस्मात उगवलेले मँग्रोज शेतकऱ्यांनी नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणे, केवळ शासनाच्या योजना विहित कालावधीमध्ये पूर्ण होत नसल्याने मोठ्या उधाणाच्या वेळी वाहत आलेले मँग्रोजचे बीज उगवणे ही नैसर्गिक बाब असल्याने याबाबत शासनाने शासन दरबारी असलेल्या नोंदी तपासल्या खेरीज कारवाई न करण्याची आवश्यकता, शासनाच्या संबंधित विभागाकडून आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याने मंजूर खारभूमी योजना व बाहेर काठा यांना मोठ्या प्रमाणावर खाडी जात असल्याने भातपिकाखालील जमिनीचे नुकसान होत राहणे, यासाठी नैसर्गिकरित्या उगवलेल्या मँग्रोजसंबंधी शेतकऱ्यांच्या ७/१२ ची खात्री केल्याखेरीज कोणतीही दंडात्मक अथवा फौजदारी कारवाई करू नये अशी शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, यामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **श्री.विक्रमसिंह पाटणकर,** प्रा. लक्ष्मण ढोबळे, श्री. जितेंद्र आव्हाड **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात माहे जून २०१३ पासून विविध भागात आलेल्या अतिवृष्टीमुळे सातारा जिल्हयातील पाटण, सातारा, महाबळेश्वर येथे मोठया प्रमाणावर अतिवृष्टी होवून सन २०१२ च्या तुलनेत २६०० मि.मी. दीड महिना अगोदर पावसाची नोंद होणे, त्यामुळे कोयना धारणामध्ये दीड महिन्याआधी जादा पाणीसाठी झाल्याने धरणातून नदीपात्रात पाणी मोठया प्रमाणावर सोडण्यात येत असणे, त्याचबरोबर नदीनाल्यांना पूर आल्याने व धरणातून पाणी सोडण्यात आल्याने नदीकाठावरील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये असणाऱ्या पिकांचे, शेतीपंपाचे, सहकारी संस्थांचे पंपसेट, विद्युत रोहित्रे, स्टाईर इ. चे पाणी शिरल्याने नुकसान होणे, पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच मोठया सहकारी पाणीपुरवठा योजनांच्या जॅकवेलमध्ये पाणी शिरल्याने मोठया प्रमाणावर गाळ जावून बसलेला असणे, या योजना पुढील ४ ते ५ महिन्यात दुरुस्त होणार नसल्याने शेतकऱ्यांना भरपाई मदत घ्यावी लागणार असणे, तसेच पाटण तालुक्यातील अतिवृष्टीमुळे रस्ते, पूल, साकव यांची पावसाने वाहून गेल्याने दुरावस्था झाली असणे, त्याकरिता दुरुस्तीकरीता तातडीने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असणे, तसेच पाटण तालुक्यातील बोर्गेवाडी (मेंढोशी) घेरादातेगड, जिमनवाडी, शिरळवस्ती या ठिकाणी अतिवृष्टीमुळे कडे ढासळण्याचा धोका निर्माण झालेला असणे तसेच नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीकाठच्या गावांना वाहून जाण्याचा व जिवितहानीचा धोका निर्माण झालेला असणे या अतिवृष्टीमुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा अशी तेथील लोकांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(१४) **सर्वश्री सुरेश हाळवणकर,** रशीद ताहीर मोमीन, अबू आजमी, अनिल गोटे, विजय देशमुख, चंद्रदीप नरके, रुपेश म्हात्रे, डॉ.सुजित मिणचेकर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"इचलकरंजी शहराच्या हद्दीपासून ३० किमी अंतरावर एकही शासकीय रुग्णालय नसणे, त्यामुळे पंचक्रोशीतील १६ गावांतील ग्रामस्थ इचलकरंजी नगरपालिकेचे इंदिरा गांधी मेमोरीयल रुग्णालयावर अवलंबून असणे, रुग्णालयाची एकूण ३५० खाटांची क्षमता असताना सद्यःस्थितीत १७५ खाटा सुरु असणे, सद्यःस्थितीत प्रतिवर्षी ८ कोटी रुपयांचा तोटा सहन करून सदर रुग्णालय नगरपरिषदेस चालवावे लागत असणे, अ वर्ग नगरपरिषदांच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ६० टक्के निश्चित करण्यात आली असताना इचलकरंजी नगरपालिकेचा सन २०१२-१३ चा आस्थापना खर्च ६९.४० टक्के असल्याने सदर रुग्णालय शासनाकडे वर्ग करण्याचा आदेश नगरपरिषद संचालनालयाकडून विशेष पत्राद्वारे देण्यात येणे, यापूर्वी कौन्सिल ठराव नं. २८२, दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० द्वारे सदर रुग्णालय शासनास वर्ग करून चालविण्याचा निर्णय घेतला असणे, त्यानुसार शासन स्तरावर सदरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना उपरोक्त ठराव रद्द करून रुग्णालय नगरपरिषदेनेच चालविण्याचा निर्णय कौ.ठ.नं.५४, दिनांक ४ जून, २०१२ द्वारे घेण्यात येणे, सन २०१२ मध्ये इचलकरंजी शहरात पसरलेल्या भीषण कावीळ साथीमध्ये ३५ लोकांचा मृत्यू होऊन १० हजार

लोकांना कावीळ साथीची लागण होणे, सदर साथीमध्ये उपचार करण्यास सदर रुग्णालयांची यंत्रणा कुचकामी ठरणे, रुग्णालयामधील मोठ्या प्रमाणातील गैरसोयीमुळे रुग्णांचे प्रचंड हाल व आर्थिक नुकसान होत असणे, तसेच शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील ६ लाख लोकसंख्येसाठी सदर ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय स्थापन करणेची मागणी गेली अनेक वर्षे प्रलंबित राहिल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाचे वातारवण, त्यामुळे सदर रुग्णालय शासनाकडे वर्ग करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५)** **ॲड.अशोक पवार,** सर्वश्री राहुल मोटे, संजय वाघचौरे, प्रशांत बंब, बाळासाहेब पाटील, रमेश थोरात, नवाब मलिक, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे जिल्ह्यातील डिंभे धरणाच्या जलाशयातून आंबेगाव व शिरुर तालुक्यातील शेती सिंचनासाठी सुमारे ११६ कि.मी. लांबीचा उजवा कालवा काढण्यात येणे, या कालव्याच्या सुरुवातीच्या साठ किलोमीटरचा लाभ आंबेगाव तालुक्यातील मंचर, पोंदेवाडी परिसराला होणे, ६० ते ११६ कि.मी. हा भाग शिरुर तालुक्यात येणे, मात्र निमगाव भोगी गावाच्या पुढे आजपर्यंत या कालव्याचे पाणी गेलेले नसणे, कर्डेलवाडी व सरदवाडीजवळ ज्यांच्या जमिनीतून हा कालवा जातो त्यांना भरपाई न मिळाल्याने भूसंपादन प्रक्रियेअभावी कालव्याचे काम ठप्प असणे, उर्वरित भागात संपूर्ण खोदाईचे काम पूर्ण झालेले असणे, निमगाव भोगीच्या पुढे पाणी येऊ न शकल्याने दोन हजार हेक्टर क्षेत्र डिंभेच्या पाण्यापासून वंचित असणे, संपादन न करताच डिंबा उजव्या कालव्याचे खोदकाम झाल्याने या जमिनीचा वापर करता न येणे, नुकसानभरपाई नाही, पाणी नाही आणि जमिनीचा वापरही नाही अशी अवस्था येथील शेतकऱ्यांची होणे, या कालव्याद्वारे आंबेगाव तालुक्यातील ८,६६१ हेक्टर व शिरुर तालुक्यातील ६,९०७ हेक्टर म्हणजे एकूण १५,५६८ हेक्टर सिंचनक्षेत्र निर्माण होणार असणे, आतापर्यंत आंबेगाव तालुक्यात ८,११३ हेक्टर व शिरुर तालुक्यातील ३,८७५ हेक्टर म्हणजे एकूण ११,९८८ हेक्टर सिंचन निर्मिती झाली असणे, उर्वरित ३,५८० हेक्टर सिंचन निर्मिती करणे बाकी असणे, डिंभे उजव्या कालव्याच्या वितरण व्यवस्थेची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी रु. २४ कोटी निधीची तसेच उर्वरित मातीकामे व बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु. ४.५० कोटी निधीची आवश्यकता असणे, कुकडी प्रकल्पाच्या रु. २१८४ कोटी किंमतीच्या तृतीय सुधारित अहवालास शासनाची प्रशासकीय मान्यता मिळत नसल्याने निधी प्राप्त होण्यात अडचणी येत असणे, तसेच चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम पाच वर्षे प्रलंबित असल्याने, दुष्परिणाम कालव्यालगतचे शेतकरी भोगत असून त्यांच्या जमिनी नापीक होणे, चासकमान धरणातून पाणी सोडण्यास सुरुवात झाल्यानंतर डाव्या कालव्यातून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असणे, त्यावर उपाय योजना म्हणून सन २००६ मध्ये कालव्याचे अस्तरीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेणे, डाव्या कालव्याची लांबी ११० किलोमीटर असणे, त्यापैकी ० ते ७२ किलोमीटर कालव्याचे अस्तरीकरण करण्याचे ठरणे, त्यानूसार ८१ कोटी रुपयांची निविदा काढण्यात येणे, पी.व्ही.आर प्रोजेक्ट या एजन्सीला हे काम मिळणे, हे काम सन २००६ मध्ये सुरु केल्यानंतर दोन वर्षात संपवायचे असे ठरणे, कामाची दोन वर्षाची ही मुदत सात वर्षे झाली तरी आजतागायत संपलेली नसून अवघे तीस ते पस्तीस टक्के काम झालेले असणे, साधारणपणे १० ते १७ किलोमीटरच्या भागात आणि ३७ ते ४९ किलोमीटरच्या कालव्याच्या भागात हे काम झालेले असणे, या

कामाला तीन ते चार वेळा मुदतवाढ दिलेली असून सद्याची मुदतवाढ २०१५ पर्यंत दिलेली असणे, या मुदतवाढीला आपोआपच ठेकेदारी साहित्याची भाववाढ मिळत असणे, निविदेमध्ये तशी अट असणे त्यामुळे काम उशिरा होऊन ठेकेदाराला काही तोटा होत नसून उलट कामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम सतत वाढत राहणे, या प्रकल्पाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ पासून प्रलंबित असलेल्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंत्रीमंडळाची त्वरेने मान्यता मिळण्याची आवश्यकता, जो निधी देण्याकरिता सुप्रमाची अडचण नाही असा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज, सर्व्हे करून लोकेशन्स निर्देशित करणे व त्याप्रमाणे लायनिंग करणे ही कामे निधी उपलब्ध करून देऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१६) **श्री.संजय राठोड, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नगरपरिषद दिग्रस, जि.यवतमाळ शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या धावंडा नदीच्या पाणलोट क्षेत्रात दिनांक ९ ते १० जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे ९५७ घरे बाधित होऊन प्रचंड वित्तीय हानी व जिवितहानी पाहता मदत व पुनर्वसन विभागाने दिनांक २८ जानेवारी, २००८ अन्वये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पुनर्वसनाची कामे करण्याकरिता नगरपरिषदेला ६० लाख रुपयांचा विरोध निधी उपलब्ध करून दिलेला असणे, जागा खरेदी करताना जागेवरील तलाव व जागा औद्योगिक, बगिचा, डी.पी. रोड राखीव आरक्षणाकरिता जाणिवपूर्वक डोळेझाक करण्यासोबत नगररचना विभागाचे अभिप्राय न घेता जागा खरेदी करून केलेला गैरप्रकार, पुनर्वसनाच्या ९५२ घरकुलांपैकी १५ टक्के कामे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराला १ कोटी ७४ लाख रुपयांचे देयक प्रदान करण्यात येणे, पुनर्वसनाची कामे करण्याकरिता नगरपरिषदेला २२ कोटी रुपयांची आवश्यकता असताना शासनाने निधी न दिल्याने संथ गतीने चालू असलेली कामे व भविष्यात सर्वच कामे बंद पडण्याची निर्माण झालेली परिस्थिती, शहराच्या मध्यभागातील धावंडा नदीवरील असलेला अरुंद व कमी ऊंचीवरील पूल, पुलाराचे पाणी पुलावरून जाण्यास अत्यंत अपुरी जागा असल्याने दरवर्षी पावसाळ्यात ३ कि.मी. अंतराचा भाग अत्यंत दुर्गंधीयुक्त होणे, झाडे व डासांमुळे साथीचे रोग पसरून रुग्णांचे झालेले मृत्यू, पुनर्वसनाची कामे माहे डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे धोरण असताना निधी अभावी व कंत्राटदारांच्या संथ गतीने कामामुळे पूरग्रस्त कुटुंबाना जीव मुठीत धरुन जगावे लागत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेली सुरक्षिततेची भावना व दहशतीचे वातावरण, पूरग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन करण्याकरिता शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व नगरपरिषदेकडून जागा खरेदीत झालेल्या गैरप्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची असलेली गरज, शहराच्या मध्यभागातील नदी सरळीकरणाचा प्रस्ताव तयार करून मान्यता देण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी शासनाविरुध्द पूरग्रस्त कुटुंब व सर्वसामान्य नागरिकांमध्ये शासनाविरुध्द पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१७) **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"जोगेश्वरी पूर्व येथील जोगेश्वरी विक्रोळी जोड रस्त्यालगत असलेला दुर्गानगर, प्रतापनगर, दत्त टेकडी, स्मशानभूमी शिव टेकडी हा संपूर्ण परिसर ना विकास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येणे, सदरहू ठिकाणी सन १९५० पासून झोपड्यांचे बांधकाम करण्यात आलेले असून सद्य:स्थितीत हजारो नागरिक या ठिकाणी झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्यास असणे, सदरहू परिसर ना विकास क्षेत्र म्हणून शासनाने घोषित केलेला असल्यामुळे सदरहू ठिकाणी झोपडपट्ट्या पुनर्वसन योजना राबविण्यात अडचण निर्माण होणे, याबाबत सन २०१० मध्ये मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव सादर करण्याबाबत तत्कालिन मा.मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना निर्देश दिलेले असणे, परंतु अद्यापही अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करण्यात न आल्याने सदरहू जागेवरील ना विकास क्षेत्राचे आरक्षण कायम असणे, परिणामी परिसरातील हजारो नागरिक त्यांच्या विकासापासून तसेच त्यांच्या हक्काच्या पक्क्या घरांपासून वंचित असणे, सदरहू क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस शासनाची परवानगी मिळत नसल्याने व परिणामी झोपडपट्टीचे निर्मूलन होत नसल्याने परिसरात अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य पसरत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच मूलभूत सुविधांपासून नागरिक वंचित असणे, सदरहू परिसरात सन १९५० पासून वास्तव्यास असणाऱ्या निराधार झोपडपट्टीवासियांच्या विकासाकरिता या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास परवानगी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून शासनाकडे वारंवार मागणी करूनही या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, दिनांक ३१ जुलै, २००२ रोजी जनहित याचिका क्र.११५२/२००२ मध्ये मा.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार ना विकास क्षेत्र, उद्याने, खेळाची मैदाने, इ. मोकळ्या जागांवर मा.न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही नवीन पुनर्वसन योजना राबविण्यात येऊ नयेत तसेच आरक्षित जागेवरील आरक्षण उठविताना मा.न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक असणे, सदरहू कारण पुढे करून या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात परवानगी नाकारणाऱ्या शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक न नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) व त्यानंतर ३७(१)(अ) च्या नोटीसीअन्वये फेरबदल प्रस्तावित करून त्यानुसार दिनांक २३ जून, २००५ रोजी याच परिसरातील ना विकास क्षेत्रातील काही भूखंडावरील आरक्षण दिनांक ३१ जुलै, २००२ रोजीच्या मा.न्यायालयाच्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून नियमबाह्यरित्या उठवून मे.ओबेरॉय विकासकास बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येणे, सद्य:स्थितीत मे.ओबेरॉय या विकासकामार्फत सदर जागेवर इमारतीचे बांधकाम सुरु असणे, एकीकडे खाजगी विकासकाकरिता ना विकास क्षेत्रातील जमिनीवरील आरक्षण नियमबाह्यरित्या उठवून त्या ठिकाणी टोलेजंग इमारती बांधण्यास परवानगी देणाऱ्या शासनाने गरीब जनतेसाठी राबविल्या जाणाऱ्या प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस नाकारलेली परवानगी पाहता शासनाच्या या भूमिकेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

**(१८)** **सर्वश्री प्रताप सरनाईक, राजन विचारे, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळी व अनधिकृत इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांचा पुनर्वसनाचा निर्माण झालेला प्रश्न, त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक चाळी व इमारती धोकादायक स्थितीत असून त्यांची

पुनर्बांधणी होणे आवश्यक असून त्याकरीता महापालिकेच्या माध्यमातून एक धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, कारण पावसाळ्यात या इमारती कोसळून मोठया प्रमाणात जिवितहानी होण्याची शक्यता, शासन स्तरावर जर या धोकादायक इमारतींकरीता एक धोरण निश्चित करण्यात आले तर शासनाच्या निर्णयाने धोकादायक चाळी तसेच इमारतींमध्ये जीव मुठीत धरुन राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असणे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ७० ते ८० च्या दशकातील इमारती असून या इमारतीची झालेली अतिशय दयनीय अवस्था, अशा धोकादायक इमारती पडून अनेक दुर्घटना घडणे, गत वर्षी भाईंदर पूर्व येथील लताकुंज इमारत कोसळून अनेक निरापराध नागरिकांचा मृत्यू होणे, त्या इमारतींपेक्षाही भयंकर परिस्थिती मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील इमारतींची होणे, महापालिकेने या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन सादर करावयास सांगूनही स्ट्रक्चरल ऑडिटसाठी आर.सी.सी. कन्सलटन्टला देण्यात येणारा रु. ४० हजार पर्यंतचा खर्च त्या इमारतीमधील राहणाऱ्या सर्व सामान्यांना न परवडणारा असल्याने त्यातील अर्धा खर्च महापालिकेने उचलणे आवश्यक असणे, कारण या धोकादायक इमारतीमध्ये राहणारे रहिवासी जसे जबाबदार आहेत त्याचप्रमाणे रस्ते, ड्रेनेज, पायवाटा, पाण्याचा निचरा या सारख्या मूलभूत सुविधा महापालिकेने न पुरविल्याने सदरच्या इमारती धोकादायक होण्यास कारणीभूत ठरणे, याबाबत संबंधित विभागाकडे सतत पाठपुरावा करूनही तसेच अधिवेशनादरम्यान वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधूनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय घेण्यात येत नसल्याने नागरिकांना जीव मुठीत धरुन रहावे लागत असणे, त्यामुळे अनधिकृत घरात राहणाऱ्यांनाही सुरक्षित पक्के घर मिळावे, यासाठी शासनाने त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून अशा इमारतींकरीता गृहनिर्माण धोरणात बदल करावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ) अल्पसूचना प्रश्न :-**

(१) **"नालासोपारा पुर्वेतील आदर्श कपोल समाज सोसायटीमधील एफ-१ इमारतीचा भाग कोसळून झालेली दुर्घटना"** या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक ११६८५२.

(२) **"चंद्रपूर शहरातील रस्त्यांचे झालेले निकृष्ट बांधकाम"** या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक ११६८२२.

**(ब)** (१) शुक्रवार, दिनांक २६ जुलै, २०१३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११२३३३ **"सांगली जिल्ह्यातील छावणीतील जनावरे तसेच त्यांच्या सोबत असलेले शेतकरी आजारी असल्याबाबत"**

(२) बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री.नितीन सरदेसाई व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११६२७५ **"मुंबई, ठाणे तसेच नवी मुंबईतील उड्डाणपुलाखालील जागा वाहनतळ व्यवस्थेकरिता देण्यात आल्याबाबत"**

**(क) तारांकित प्रश्न**

**(ड)** अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या क्रमांक ६०५ ते ६११ मुद्रित स्वरुपात व ६१२ ते ६२१ अमुद्रीत स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** :

(अ) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २००८-२००९ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री** :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "भाडेपट्टीवर दिलेल्या शासकीय जमिनींचे संपादणूक लेखापरिक्षण अहवाल क्रमांक-५" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** :

(अ) मा.राज्यपाल महोदयांनी विविध पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१२-२०१३ मधील वितरीत तरतूद व मार्च, २०१३ अखेर खर्चाचा महामंडळ/ जिल्हानिहाय तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

: (ब) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल व ३१ मार्च, २०१२ अखेरचा ताळेबंद - नफा तोटा पत्रक सभागृहासमोर ठेवतील.

(ड) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा लेख्यावरील भारताचे नियंत्रण व महालेखापाल यांचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री** : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.**

**चार : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचा म.वि.स. नियम १८३(१) अन्वये प्रस्ताव :-**

"मजूर सहकारी संस्थांना सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे द्यावी किंवा कसे याबाबत परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी विधानसभा सदस्यांच्या गठीत केलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत सन २०१४ च्या मार्च-एप्रिल (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून देण्यात यावी."

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल).

**(ब) लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-**

(१) **सामाजिक न्याय मंत्री** : "यवतमाळ जिल्ह्यातील अहिल्यादेवी होळकर स्मारक संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहातील मुलाचा झालेला मृत्यु" या विषयावरील दिनांक १७ डिसेंबर, १९९६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरांदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कामगार मंत्री** : "मुंबई, ठाणे येथील बंद पडलेल्या विविध कारखान्यातील कामगारांना देय रक्कम न मिळाल्यामुळे होत असलेला अन्याय" या विषयावरील दिनांक ०८ एप्रिल, २०१० रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरांदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सार्वजनिक आरोग्य मंत्री** : "एड्स रोगाचे वाढत असलेले प्रमाण" या विषयावरील दिनांक ०८ डिसेंबर, २००५ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरांदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**सात : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री एकनाथराव खडसे(पाटील), सुभाष देसाई, बाळा नांदगांवकर, गणपतराव देशमुख, देवेंद्र फडणवीस, गिरीष बापट, सुधीर मुनगंटीवार, रविंद्र वायकर, नाना पटोले, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री गिरिष महाजन, नितीन सरदेसाई, ॲड.आशिष जयस्वाल,सर्वश्री चैनसुख संचेती,विजयराज शिंदे,प्रकाश शेंडगे, विजय शिवतारे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :-**
**(मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असून माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागवून सत्य माहिती जनतेसमोर उघड करणाऱ्या (RTI) कार्यकर्त्यांच्या दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या व अल्पवयीन मुली व महिलांवर सामुहिक बलात्कार करुन त्यांच्या हत्या करण्याच्या तसेच ॲसिड व उकळते तेल टाकून जिवे मारण्याच्या आणि खंडणीसाठी अल्पवयीन मुले, व्यापारी व बिल्डर्स यांच्या होणाऱ्या हत्या रोखण्यात शासनास आलेले अपयश, चोऱ्या, दरोडे, बँका व ज्वेलर्सची होणारी लूट, सायबर गुन्हे, महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या खेचण्याच्या घटना वाढीस लागून लोकल ट्रेनमध्ये महिलांवर हल्ले होऊन त्यांचा होत असलेला विनयभंग व लैंगिक अत्याचार, पाकिस्तानी, बांगलादेशीय व इतर परकीय व्यक्तींकडून अंमली पदार्थ व बनावट नोटा

चलनात सहजगत्या उपलब्ध होणे, दुप्पट रकमेचे आमिष दाखवून खासगी व्यक्ती व संस्थांकडून सर्वसामान्य गरजू जनतेची होत असलेली फसवणूक, वाढत्या नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात न आल्यामुळे त्यांचे हल्ले सुरुच असणे, वाळू माफियांकडून सरकारी अधिकारी, पोलीस व सर्वसामान्य जनता यांच्यावर होणारे प्राणघातक हल्ले व त्यांच्या करण्यात येत असलेल्या हत्या, तुरुंगातील कुविख्यात कैद्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा होत असून त्यांना मिळणारी शाही वागणूक व त्यातुनच तुरुंगातील कैद्यांवर होणारे प्राणघातक हल्ले, यामुळे व तुरुंगात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवल्यामुळे कैद्यांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेला प्रश्न, तसेच राजकीय हस्तक्षेपामुळे आरोपींवर कारवाई करण्यात होत असलेला विलंब, पोलिसांकडून गुन्हेगारांचा शोध घेऊन कारवाई करण्यात होत असलेला विलंब व पिडीत महिलांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीसाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनावर व पोलिसांवर ओढलेले ताशेरे, तसेच पोलिसांमधील वाद व त्यांच्या विविध समस्या सोडविण्यास शासनाला आलेले अपयश, मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अद्यापपर्यंतही सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नसून राज्य सुरक्षा परिषदेच्या बैठका वेळेवर न होणे, विविध विभागात भ्रष्टाचार व लाचखोरीची प्रकरणे उघडकीस येत असतानाही शासनाकडून त्याबाबत कारवाई करण्यात होत असलेला अक्षम्य विलंब व टाळाटाळ आणि आदर्श सोसायटी प्रकरणी नेमलेल्या समितीचा अहवाल त्यामध्ये झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार दडपण्यासाठी अद्यापही सभागृहात सादर करण्यात न येणे, तसेच गॅस, पेट्रोल व इंधनाच्या झालेल्या दरवाढीचा परिणाम सर्वच क्षेत्रावर होऊन वाढलेल्या महागाईत राज्यातील जनतेला दैनंदिन गरजेच्या जीवनावश्यक वस्तू व भाज्या नियंत्रित दरात पुरविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात तसेच दलाल, साठेबाज यांच्यावर कारवाई करण्यात शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यातील जनतेच्या सुरक्षेच्या आणि जीवन जगण्याच्या निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर योग्य त्या उपाययोजना करण्यासंदर्भातील शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे जनमानसात निर्माण झालेली तीव्र चीड व त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : म.वि.स. नियम २९२ च्या प्रस्तावाच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-**

**उद्योग मंत्री** : **"राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील वाढता अनुशेष"** या विषयावरील दिनांक १० जून, २००४ रोजी झालेल्या म.वि.स. नियम २९२ च्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**(१) सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ यात विधानसभेने केलेल्या सुधारणांना विधानपरिषदेने दिलेल्या सहमतीबाबतचा विधानपरिषदेकडून आलेला संदेश.**

---

**(२) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ विधेयक, २०१३.

---

**(३) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक, २०१३.

---

**(४) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.चिंतामण वनगा, श्री.विष्णु सावरा, डॉ.खुशाल बोपचे, श्री.नाना पटोले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नाना पटोले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**दहा : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**सर्वश्री प्रशांत बंब, पृथ्वीराज साठे, चंद्रकांत दानवे, प्रदिप नाईक, शंकर धोंडगे, संतोष सांबरे, श्रीमती मीराताई रेंगे पाटील, सर्वश्री बदामराव पंडीत, प्रकाश सोळंके, हनुमंत पाटील-बेटमोगरेकर, संजय जाधव, आर.एम.वाणी, श्रीमती पंकजा मुंडे पालवे, डॉ.कल्याण काळे, सर्वश्री राहूल मोटे, सुरेश जेथलीया, जयप्रकाश दांडेगांवकर, संजय शिरसाट, सिताराम घनदाट, डॉ.सुधाकर भालेराव, सर्वश्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, हर्षवर्धन जाधव, ज्ञानराज चौगुले, रामप्रसाद कदम-बोर्डीकर, विजय वड्डेटीवार, संजय वाघचौरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"मराठवाडा व विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात विलीन नागपूर पॅक्ट-१९५३ व अकोला पॅक्टनुसार या दोन्ही विभागांचा अनुशेष दूर करण्याचे आश्वासन त्यावेळी देणे, त्यानुसारच जायकवाडी धरणाची निर्मिती होणे, तरीही पाण्याचा अनुशेष दूर न होणे, मराठवाडा पाण्याअभावी सतत टंचाईग्रस्त राहणे, तब्बल ६० वर्षांनी महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधिकरण कायदा, २००५ अस्तित्वात येणे, परंतु कायद्याला नियम नसल्याच्या नावाखाली समन्यायी पाणी वाटपाच्या कायद्याची अंमलबजावणी न करणे, प्रारुप नियम तयार करणेस शासनाने मुद्दाम ७ वर्षे उशीर लावणे, दि. २२ सप्टेंबर, २०१२ ला फक्त प्रारुप नियम शासन राजपत्रात प्रसिध्द करणे, नियम

सर्व सामान्यांना माहित होवू नयेत म्हणून प्रारुप नियम दैनिक वर्तमानपत्रात मुद्दाम प्रसिध्द न करणे, आक्षेप आल्याचे मान्य असूनही अंतिम नियमात आलेल्या आक्षेपांचा उल्लेख न करणे, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने अंतिम नियम दि. २ मे, २०१३ ला प्रसिध्द करणे, मूळ कायद्याला बगल देवून त्यातीत हवा काढून घेणे व विसंगती ठेवणे, कायद्याच्या कलम १२(६-क) मधील तरतुदीनुसार समन्यायी पाणी वाटपाबाबत नविन नियमात तरतूद न ठेवणे, मा. राज्यपालांच्या निर्देशांचा भंग करणे, कायद्यातील "टेल टु हेड" या सिध्दांतानुसार पाणी वाटप न होणे, नियम २(ग) व ११ ची तरतुद करुन पाणी टंचाईच्या काळात सुध्दा ३३% पाणीसाठा असल्यास, पाणी न सोडण्याची तरतुद नवीन नियमांत करणे व अनुशेष दूर होवू न देणे, दि. २६ सप्टेंबर, २००४ च्या पत्रान्वये जायकवाडीच्या उर्ध्व भागात नविन धरण बांधण्यास मनाई केलेली असतानाही "निळवंडे" व इतर अनेक नविन धरणांना मंजुरी देणे, जायकवाडीच्या उर्ध्व भागात आवश्यक ते पाणी साठल्यानंतरसुध्दा, जायकवाडीचे पाणी मुद्दाम अनधिकृत धरणाकडे वळविणे, परंतु त्याच वेळी मराठवाडयातील अनुशेष संपला असे खोटे आकडे देवून कोणत्याही नवीन प्रकल्पास मान्यता न देणे, मा.राज्यपालांच्या मार्गदर्शक तत्वानुसार खोरे निहाय आढावा घेवून पाणी वाटपाची पडताळणी होणे, मराठवाडयात सहकार कायद्यानुसार स्थापन झालेल्या पाणी वापर संस्थांना मान्यता न देणे व उर्ध्व भागांतील संस्थांना मान्यता देणे, त्यामुळे उर्ध्व भागाला ११५.५ टी.एम.सी. पाणी अनुज्ञेय असताना, १७३.७५ टी.एम.सी. पाण्याचा वापर करु देणे, संनियंत्रण न ठेवणे, मा. मुख्यमंत्र्यांनी दि. ३० मे, २०१३ पर्यंत पाण्याचे समन्यायी वाटप व टेल टू हेड च्या सिध्दांतानुसार समन्यायी वाटपाचे आदेश देण्याचे आश्वासन देवूनही आश्वासन न पाळणे, यामुळे मराठवाडयातील जायकवाडी धरणाखालील शेतकरी, कारखानदार व सर्वसामान्य जनतेमध्ये शेती, कारखानदारी व पिण्याच्या पाण्यासाठी असंतोष निर्माण होणे, त्यावरील उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**अकरा : अशासकीय विधेयके :-**

(अ) **पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १८ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री. मंगेश सांगळे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १९ - मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २४ - भारतीय दंड संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र लग्न (पैशाची उधळपट्टी व अमर्यादित खर्च यास प्रतिबंध) विधेयक, २०१३ - **श्री.गिरीश बापट, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - मोटार वाहन (महाराष्ट्र तिसरी सुधारणा) विधेयक, २०१३ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३- **श्री.शिशिर शिंदे, वि.स.स. यांचे.**

(ब) **विचारार्थ :-**

**दिनांक ५ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील प्रलंबित अशासकीय विधेयके :-**

(१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटुंब नियोजनास चालना देण्याबाबत विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०११ **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१० चे वि.स.वि.क्रमांक ७१ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १७ - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१० - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

**बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार विचारार्थ असलेली अशासकीय विधेयके :-**

(५) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र धारण शेतजमिनींचे एकत्रीकरण विधेयक, २०१३ **श्री.नवाब मलिक, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१२ चे वि.स.वि.क्रमांक ३७ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२ - **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचे.**

(७) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २००९ **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २००९ चे विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २००९ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.**

## " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : २ ऑगस्ट, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.